मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 26 मार्च 2024 | पान- 1

# औंध जिल्हा रुग्णालयात रुग्णांच्या जीवाशी खेळ!

## आमदार आश्विनी जगतापांनी डॉक्टरांना खडसावले : कडक कारवाईचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

औंध जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरला आमदार आश्विनी लक्ष्मण जगताप यांनी चांगलंच खडसावले आहे. परिचारिकेच्या चुकीमुळे दोन रुग्णांना अतिदक्षता विभागात उपचार घ्यावे लागले. रुग्णांची प्रकृती अधिक खालावली होती. अखेर ही बाब चिंचवडच्या आमदार आश्विनी लक्ष्मण जगताप यांना समजताच त्यांनी औंध जिल्हा रुग्णालय गाठून घटनेची माहिती घेत हलगर्जीपणा करणाऱ्या परिचारिका आणि डॉक्टरला खडसावले आणि कडक कारवाई करण्याचे आदेश दिले.

औंध जिल्हा रुग्णालय हे नेहमीच चर्चेत असत. अनेक तक्रारी थेट चिंचवडच्या आमदार आश्विनी लक्ष्मण जगताप यांच्यापर्यंत गेल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या दोन रुग्णांना परिचारिकेच्या चुकीमुळे चांगलंच सहन करावे लागले. त्यांची





प्रकृती अधिकच खालावली होती. झालं असं की, दोन्ही रुग्णांना रक्त तपासून एकाला 'ए' पॉझिटिव्ह तर दुसऱ्या रुग्णाला 'बी' पॉझिटिव्ह रक्त चढवायचे होते. रक्त चढवणारी परिचारिका फोनवर बोलत असल्याने झालं उलट. 'ए' वाल्याला 'बी' आणि 'बी' वाल्या रुग्णाला 'ए' पॉझिटिव्ह रक्त चढवण्यात आले. यामुळे दोन्ही रुग्णांची प्रकृती अधिकच खलावली.

रुग्णांना थेट अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करावे लागले. याबाबतची माहिती आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना समजताच त्यांनी रुग्णांची विचारपूस करण्यासाठी औंध जिल्ह्या रुग्णालय गाठलं. नातेवाईकांसमोर डॉक्टरांना बोलवून घेऊन चांगलंच झापले. असे प्रकार होतातच कसे? असा प्रश्न विचारत रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा अधिकार कोणी दिला, असे म्हणत संबंधित परिचारिकेवर कडक कारवाई करण्याचे आदेश आमदार आश्विनी लक्षण जगताप यांनी औंध जिल्हा रुग्णालय प्रशासनाला दिले. या घटनेमुळे औंध जिल्हा रुग्णालयात डॉक्टर आणि परिचारिका कशा प्रकारे उपचार करत असतील याचा प्रत्येय येतो. घटनेतील परिचारिकेवर कारवाई करणं गरजेचं आहे.

# वाहतूक कोंडीत भर : वाहनचालकांना मनस्ताप

## महापालिकेकडून पूरस्थिती रोखण्यासाठी पावसाळी वाहिन्या टाकण्याचे काम सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या पथ विभागाकडून विविध सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदाईची परवानगी दिल्याने शहरात विविध रस्त्यांवर खोदाईची कामे सुरू झाली आहेत. खोदाईनंतर रस्ते वेळेत पूर्ववत करण्यात येत नसल्याने रेंगाळलेल्या कामांचा नागरिकांसह वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू झाली असतानाच पुणे महापालिकेच्या पथ विभागाकडून शहरात वेगवेगळ्या भागांत पूरस्थिती रोखण्यासाठी नव्याने पावसाळी वाहिन्या



टाकण्याचे काम सुरू आहे. मध्यवर्ती भागातील पेठांच्या भागासह अनेक ठिकाणी मोठ्या आकाराच्या ड्रेनेज वाहिन्या, पावसाळी वाहिन्यांची कामे सुरू आहेत. पेठांसह मुख्य रस्त्यांवर ही खोदाई सुरू आहे. याशिवाय वेगवेगळ्या सेवा वाहिन्या टाकण्यास महापालिकेने सशुल्क परवानगी दिल्याने विविध रस्त्यांवर खोदाईची कामे सुरू आहेत

या खोदाईमुळे शहरातील अनेक भागांत वाहतूक कोंडी होत आहे. ज्या भागात रस्तेखोदाई सुरू आहे, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर खडी, माती, धुळीचे साम्राज्य आहे. पाण्याच्या लाइनमुळे काही भागांत चिखल झाला आहे. त्यामुळे अनेकदा दुचाकी वाहने घसरून अपघाताचा धोकाही निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी रस्ते खोदाई केल्यानंतर त्वरित रस्ता दुरुस्त केला जात नाही. खोदलेला रस्ता बुजविल्यानंतर जागेवरच राडोराडा पडलेला असतो. अनेकवेळा रस्ता बुजविल्यानंतर तो भाग डांबरीकरण किंवा सिमेंट कॉंक्रिटीकरण लवकर केले जात नाही. त्यामुळे रेंगाळलेल्या कामाचा नागरिक आणि वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

### पर्यायी रस्त्यांचे फलक नाहीत...

खोदाई करणारी कंपनी, ठेकेदार, जबाबदार अधिकाऱ्यांचे नाव आणि मोबाईल क्रमांक, काम कधी सुरू केले आणि कधी संपणार, याची माहिती असलेला फलक लावणे, वाहतूक कोंडी होणार नाही, याची खबरदारी घेणे, ट्रॅफिक वॉर्डन नेमणे आदी सूचना महापालिकेने दिल्या आहेत. मात्र, अशाप्रकारचे माहिती फलक कोठेही लावण्यात आलेले नाहीत. पर्यायी रस्त्याचे फलक नसल्याने ऐनवेळी माघारी फिरावे लागते.

# पुण्यात राजकीय नेत्यांची धुळवड

## राजकारण बाजूला ठेवूया : नेते म्हणतात...आजचा दिवस होळीच्या रंगात न्हाऊन जाऊया!

**पुणे | प्रतिनिधी**

धुळवडीचा आनंद जल्लोषात साजरा केला जात आहे. शहरातील लॉन्समध्ये अभिनेते, कलाकारांना बोलावून मोठमोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोसायट्यांमधून लहान मुले, कुटुंब रंग खेळण्यात दंग झाल्याचे दिसून आले आहे. तर ऐन निवडणुकीच्या मुहूर्तावर एक दिवस प्रचाराला आराम देऊन राजकीय नेत्यांनी धुळवडीचा आनंद लुटला आहे. पुण्यात काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर, भाजप नेत्या मेधा कुलकर्णी आणि रुपाली चाकणकर हे एकत्रित रंग खेळताना दिसून आले आहेत



राजकारण बाजूला ठेवूया आणि आजचा दिवस होळीच्या रंगात न्हाऊन जाऊया असं मत पुण्यातील ३ बड्या नेत्यांनी व्यक्त केलंय. इतर दिवशी एकमेकांवर टीका टिपणी करणाऱ्या विविध पक्षातील नेत्यांनी आज एकत्र येत एकमेकांना रंग लावला. या वेळी या तिघांनी एकमेकांना रंग लावून राजकारण आजच्या दिवशी विसरायचं आणि सणाचा आनंद लुटायचा आहे अशी प्रतिक्रिया दिली.

भोई प्रतिष्ठान सामाजिक काम करणारी संस्था आहे. त्यांनी मुलांच्या आनंदासाठी हा कार्यक्रम आयोजित केला आहे असे धंगेकर यांनी यावेळी सांगितले.

निवडणुकीबाबत धंगेकर यांना विचारले असता ते म्हणाले, पुणेकरांनी ही निवडणूक हातात घेतली आहे. आणि त्यांचा उमेदवार समोर आहे. आमच्या मागे वस्ताद आहे. त्यामुळे मी ही निवडणूक लढणार अन् जिंकणारही असा विश्वास धंगेकर यांनी व्यक्त केला आहे.

### विशेष मुलांनी लुटला आनंद...

यामध्ये अनाथ, एचआयव्ही पॉझिटिव्ह, मतिमंद ,अपंग अंध ,मुले रेल्वे प्लॅटफॉर्मवर बूट पॉलिश करणारी मुले ,बुधवार पेठेतील देवदासी भगिनींची मुले ,रस्त्यावर डोंबाऱ्याचा खेळ करणारी मुले अशी विशेष मुले कार्यक्रमात सहभागी झाली होती. तसेच पोलीस, प्रशासन ,चित्रपट, साहित्य, कला ,संस्कृती , पत्रकारिता, राजकारण ,समाजकारण या विविध क्षेत्रातील लोकांनी मुलांसोबत रंग खेळण्याचा आनंद लुटला. पुण्यात रास्ता पेठेतील टिळक आयुर्वेद महाविद्यालय मैदान येथे भोई प्रतिष्ठान च्या वतीने विशेष मुलांसाठी रंग बरसे हा रंग महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यंदा या उपक्रमाचे २८ वे वर्षे असून यंदा या उपक्रमात सुमारे हजारो विशेष मुले रंग महोत्सवाचा आनंद लुटताना दिसून आली. यामध्ये अनाथ, एचआयव्ही पॉझिटिव्ह, मतिमंद ,अपंग अंध ,मुले रेल्वे प्लॅटफॉर्मवर बूट पॉलिश करणारी मुले ,बुधवार पेठेतील देवदासी भगिनींची मुले ,रस्त्यावर डोंबाऱ्याचा खेळ करणारी मुले अशी विशेष मुले कार्यक्रमात सहभागी झाली होती.

# सुट्टी दिवशीही कर संकलन कार्यालये सुरू

## कर संकलन व कर आकारणी विभाग : 31 मार्चपर्यंत कर संकलन कार्यालये सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

आता नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरता यावा, यासाठी 31 मार्चपर्यंत कर संकलन कार्यालये सुरू ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करवसुलीचे 1 हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरता यावा, यासाठी 31 मार्चपर्यंत कर संकलन कार्यालये सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. आजही कार्यालये सुरू आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी 17 विभागीय कार्यालये आणि ऑनलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत 865 कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. 1 हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, यासारख्या कठोर कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळेच कर भरणा वाढला आहे.

नागरिकांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे. सुट्टी असली तरी 31 मार्चपर्यंत दिवशी कर संकलन कार्यालये सुरुच ठेवण्यात येणार आहेत. शनिवार, रविवारीही कार्यालये सुरू राहणार आहेत.

### 'या' सणादिवशी कर संकलन



### कार्यालये सुरूच राहणार..

दि. 25 मार्चला धुलीवंदन आणि दि.29 मार्चला गुड फ्रायडेची महापालिकेला शासकीय सुट्टी आहे. मात्र, या दोन्ही दिवशी नागरिकांच्या सोयीसाठी कर संकलन कार्यालये सुरू राहणार आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी कर भरण्यासाठी वेळ वाढविण्यात आली आहे. नागरिकांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे. शनिवार आणि रविवार महापालिकेला सुट्टी असली तरी ३१ मार्चपर्यंत या दोन्ही दिवशी कर संकलन कार्यालये सुरुच ठेवण्यात येणार आहेत. कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, अशा कठोर कारवाया केल्या जात आहेत.

### असे असणार वेळेचे नियोजन

नागरिकांच्या सोयीसाठी कर भरण्यासाठी वेळ वाढविण्यात आली आहे. शुक्रवार (दि.१५) पासून दि. २४ मार्चपर्यंत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कॅश काऊंटर सुरू ठेवण्यात येणार आहेत. तर दि. २५ ते दि. ३१ मार्चपर्यंत सकाळी ९.४५ ते रात्री ८ वाजेपर्यंत कॅश काऊंटरवर मालमत्ता कराचा भरणा स्विकारला जाणार आहे, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

# जाहीर सभांसाठी शहरातील 66 ठिकाणे निश्चित

## महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे अर्ज करावा लागणार : 'क' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत सर्वाधिक 34 ठिकाणे

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर सभा व कोपरा सभा घेण्याकरिता पिंपरी-चिंचवड शहरातील ६६ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्याशिवाय इतर ठिकाणी राजकीय पक्षांना सभा घेता येणार नाहीत. निश्चित केलेल्या जागेवर सभा घेण्यासाठी पक्षांना किंवा उमेदवारांना क्षेत्रीय कार्यालयांकडे अर्ज करावा लागणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात मावळ, शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघाचा भाग येतो. या तिन्ही मतदारसंघातील उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी जाहीर सभा व कोपरा सभा घेण्यासाठी महापालिकेने मैदान व मोकळ्या जागा निश्चित केल्या आहेत. त्या जागेत सभा घेता येणार आहेत. त्यासाठी महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे अर्ज करावा लागणार आहे. निगडी, अ क्षेत्रीय कार्यालय हद्द – पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागील मोकळी जागा, आकुर्डी येथील खंडोबा मंदिराशेजारी जागा, आकुर्डीतील हनुमान क्रीडांगण, प्राधिकरण, निगडीतील संजय काळे क्रीडांगण, नियोजित महापौर निवासस्थानाची मोकळी जागा, मदनलाल धिंग्रा मैदान, शाहूनगर येथील राजषी शाहू महाराज मैदान अशी ठिकाणी आहेत.

रहाटणी, ड क्षेत्रीय कार्यालय हद्द – चिंचवडगाव येथील मोरया गोसावी मंदिराशेजारील मैदान, पिंपळे सौदागर येथील पालिका शाळेसमोरील शिवछत्रपती क्रीडा संकुल हे ठिकाणे आहेत.

भोसरी, ई क्षेत्रीय हद्द – भोसरी पीएमटी चौक, अंकुशराव लांडगे नाट्यगृहाजवळील चौक, लांडेवाडी चौक, भोसरी गावठाण बापुजी बुवा चौक, पीसीएमटी चौक, शीतल बाग चौक, दिघी रस्ता येथील गणपतराव फुगे विरगुंळा केंद्राजवळील चौक, भोसरीतील संत तुकारामनगर पाण्याच्या टाकीजवळील चौक, आळंदी रस्ता गव्हाणे पेट्रोल पंपाजवळील चौक, च-होली बैलगाडा घाट, च-होली फाटा, मोशी येथील शिवाजी महाराज महाराज पुतळा चौक, दिघी जुना जकातनाका चौक, डुडुळगाव, बोपखेल गावठाण, भोसरील तळ्याजवळील मैदान ही ठिकाणे आहेत.




कासारवाडी, ह क्षेत्रीय कार्यालय हद्द – पिंपळे गुरव येथील काळूराम जगताप बॅडमिंटन हॉलशेजारील मोकळी जागा, कासारवाडी येथील सितांगण उद्यानासमोरील मोकळी जागा, संत तुकारामनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान, सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदान या ठिकाणांचा समावेश आहे. निगडीतील फ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत म्हेत्रे मैदान हे एकमेव ठिकाण आहे. चिंचवड येथील ब क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील चिंचवड गावातील गोयल गरिमा सोसायटीसमोरील मैदान आणि रावेत येथील डी मार्ट समोरील फुटबॉल मैदान अशी दोनच ठिकाणे आहेत.

### क क्षेत्रीय कार्यालय हद्दीत सर्वाधिक ठिकाणे

राजकीय पक्षांना सभा घेण्यासाठी क क्षेत्रीय कार्यालय हद्दीत सर्वाधिक 34 ठिकाणे आहेत. चिखली बसथांबा, बोऱ्हाडेवाडी शाळेसमोरील मैदान, संजय गांधीनगर झोपडपट्टी समाज मंदिरासमोर, रामायण मैदान, रिव्हर रेसिडन्सीजवळील बाळाजी आल्हाट क्रीडांगण, राजे शिवाजीनगर येथील भाजी मंडई मैदान, देवकर वस्ती येथील श्रीकृष्ण मंदिर ही ठिकाणे आहेत. तसेच, चक्रपाणी वसाहतील पूर्व कॉलनी, लांडगे वस्तीतील दत्तमंदिराजवळ, जयवंतनगर येथील संघर्ष कॉलनी, घावडेवस्ती येथील बाबा आनंद मंगल कार्यालयाजवळ, भगतवस्ती येथील गणेशमंदिराजवळ, सद्गुरूनगर येथील रानतारा कॉलनी चौक, गुळवे वस्तीतील श्रीकृष्ण कॉलनी, तिरूपती चौक, संतनगर चौक, स्पाईन मॉल चौक, इंद्रायणीनगर चौक, क्वॉलिटी सर्कल चौक, खंडे वस्ती चौक, आरटीओ चौक, सेवाधाम रुग्णालय चौक, इंद्रायणी मिनी मार्केट शेजारील मैदान ही ठिकाणे आहेत. उद्यमनगर येथील रसरंग चौक, नेहरूनगर येथील संतोषी माता चौक, झिरो बॉईज चौक, मासुळकर कॉलनीतील स्केटिंग ग्राउंड, जाधववाडी येथील मैदान, सेक्टर क्रमांक 9 येथील बास्केटबॉल मैदान, सेक्टर क्रमांक 10 येथील हॉकीचे मैदान, नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम आणि अजमेरा कॉलनी येथील डॉ. हेडगेवार क्रीडा संकुल ही ठिकाणे आहेत.

# कोरड्या रंगांना पसंती देत धुळवड साजरी

## केमिकलयुक्त रंगांना बगल देत नैसर्गिक रंगांची उधळण

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाच्या झळा वाढत असल्याने पाण्याची कमतरता सर्वच भागांमध्ये जाणवत आहे. त्यामुळे यंदा धुळवडीला अनेकांनी कोरड्या रंगांना पसंती दिली. तसेच केमिकलयुक्त रंगांना बगल देत नैसर्गिक रंगांची उधळण केली.

होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच धुळवडीला देशभर रंगांची उधळण केली जाते. सोमवारी (दि. 25) सकाळपासून बच्चे कंपनी मित्रांसह घर, सोसायट्यांच्या अंगणात रंग खेळत होते. रासायनिक रंग शरीरात गेल्याने त्याचा शरीरावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे अशा रंगांच्या वापरावर बंदी घातली जात आहे.



होलिका दहन केल्यानंतर उरलेली राख एकत्र केली जाते. या राखेने दुसऱ्या दिवशी सकाळी धुळवड खेळली जाते. या राखेमध्ये मातीही समाविष्ट झालेली असते. एकमेकांना अंगावर राख लावून धुळवड हा सण साजरा केला जातो. कोकणात गावी आजही अशा प्रकारे धुळवड खेळली जाते. तर उत्तर भारतात धुळवड रंगांनी, फुलांनी साजरी केली जाते. उत्तर भारतातील प्रथा मध्य भारतात देखील रूढ होऊ लागली आहे.

महाराष्ट्रात हुताशनी पौर्णिमेला होळी साजरी केली जाते. त्यानंतर येणाऱ्या पंचमीला रंगपंचमी साजरी केली जाते. मात्र हल्ली रंगपंचमी अगोदर पाच दिवस म्हणजेच धुलीवंदनाच्या दिवशी रंग खेळले जात आहेत. पिंपरी चिंचवड शहरासह मावळ परिसरात आनंदाने रंगांची उधळण करत धुलीवंदन साजरे करण्यात आले.

# ताथवडे, मारुंजीमधील आरएमसी प्लॅन्ट बंद



**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ताथवडे व मारुंजी येथील आठ आरएमसी (रेडी मिक्स कॉंक्रीट) प्लॅन्टला नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, तर अवैधरित्या चालू असलेले सात प्लॅन्ट बंद करण्यात आले आहेत. या भागातील नागरिक व सामाजिक संघटनांनी केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली.

ताथवडे, मारुंजी या भागातील प्रदूषणाची पातळी वाढत आहे. हवेची गुणवत्ता ढासळल्याने नागरिकांना आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे, येथील रेडी मिक्स कॉंक्रीटच्या प्लॅन्टसाठी काही प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही नियम ठरवून दिलेले आहेत. त्यानुसार, प्लॅन्टला बाजूने कमीत कमी पाच फुटांपर्यंत कुंपण घालणे, धुळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पाणी मारणे हे त्यातील काही नियम आहेत.

मात्र, अनेक व्यावसायिकांकडून या नियमांचे उल्लंघन झाल्याचे मंडळाने केलेल्या पाहणीत दिसून आले. त्यामुळे, जोपर्यंत सर्व नियमांची पूर्तता होत नाही; तोपर्यंत हे प्लॅन्ट पुन्हा सुरू करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.


# उन्हाचा तडाखा; पारा 41 अंशांवर!

## राज्यात कमाल – किमान तापमानात वाढ : हवामान विभागाचा अंदाज

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे : विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रावर हवेच्या वरच्या स्तरात प्रती चक्रवाताची स्थिती तयार झाली आहे. त्यामुळे राज्यात कमाल – किमान तापमानात वाढ झाली आहे. सोमवारी अकोल्यात सर्वाधिक ४१.० अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. उष्णतेच्या झळा पुढील तीन-चार दिवस कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रावर हवेच्या वरच्या स्तरात एक प्रती चक्रवाताची स्थिती तयार झाली आहे. त्यामुळे राज्याला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागत आहे. अकोल्यात ४१.० अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. त्या शिवाय



अमरावती, वर्धा, यवतमाळ, परभणी, जेऊर, मालेगाव, सोलापूर येथे ४०.० किंवा त्याहून अधिक तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने तापमानात वाढ होण्याचा अंदाज या पूर्वीच दिला होता. तसेच पुढील तीन ते चार दिवस ही वाढ कायम राहण्याचा अंदाज आहे.

किनारपट्टीवरही उष्णतेच्या झळा ?

### कमाल तापमानात आणखी वाढ ?

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील उष्णतेच्या झळा पुढील चार दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमानात सरासरी दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान संशोधन आणि सेवा विभाग, पुणे येथील प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी दिली आहे.

राजस्थान आणि गुजरातमधील आद्रतायुक्त उष्ण वारे गुजरातमार्गे महाराष्ट्राच्या उत्तर किनारपट्टीवरून मध्य महाराष्ट्रापर्यंत येण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांत किनारपट्टीवर तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हर्णे येथे २४.६ तर बुलढाणा येथे २४.० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. त्यासह राज्यात किमान तापमान सरासरी २० ते २२ अंश सेल्सिअसवर गेले आहे. त्यामुळे राज्यभरात रात्री आणि पहाटेही उकाडा जाणवत आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील उष्णतेच्या झळा पुढील चार दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमानात सरासरी दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान संशोधन आणि सेवा विभाग, पुणे येथील प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी दिली आहे.

# बारामतीबाबत शिवतारेंचं 'फुल्ल अँड फायनल'

## मी निवडणूक लढणारच, आता माघार नाही, असा पक्का निर्धार विजय शिवतारेंनी केला

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीतून लोकसभा निवडणूक लढण्याचा पक्का निर्धार शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी केला आहे. मी निवडणूक लढणारच, मी माघार घेणार नाही, असं विजय शिवतारे यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या सर्वत्र राजकीय आरोप-प्रत्यारोप, दावे-प्रतिदावे पाहायला मिळत आहे. राज्यातील काही मतदारसंघात यंदा चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. यातीलच एक मतदार संघ म्हणजे बारामती.



अनेक बेरोजगार तरुणांनी दुग्धव्यवसायासाठी लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे. यासाठी अनेकांनी बँकेचे कर्ज घेतले आहे. ते फेडणे मुश्कील बनले आहे. राज्य सरकारने दुधाचे दर प्रतिलिटर 40 रुपये करावेत, अशी दुग्धोत्पादकांची मागणी आहे. कारखान्यांचा हंगाम संपत आल्याने जनावरांना उसाचे वाढे मिळणे कठीण बनले आहे. उन्हाची दाहकता वाढल्याने मका पिकावर मर्यादा दिसून येत असल्याने चारा महाग झाला आहे.

### बारामतीतून लढण्यावर विजय शिवतारेंचा पक्का निर्धार

बारामतीमध्ये सध्या विजय शिवतारे विरुद्ध अजित पवार असा वाद उफाळून येताना दिसत आहे. बारामतीमध्ये महायुतीकडून अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांचं नाव जवळपास निश्चित आहे. मात्र, असं असलं तरी शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे बारामतीतून लढण्यावर ठाम आहेत. विजय शिवतारे यांनी बारामतीतून निवडणूक लढणार असल्याचा पुनरुच्चार केला आहे.

### बारामतीत विजय शिवतारेंकडून प्रचार सुरु

विजय शिवतारे बारामती लोकसभा मतदारसंघातील वेगवेगळ्या भागांमध्ये जाऊन भेटीगाठी घेत आहेत एक अर्थाने ते प्रचार करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी समजवल्यानंतर देखील विजय बापू शिवतारे लोकसभा लढवण्यावर ठाम आहेत. पुण्यातील कात्रज आंबेगाव नरे हा सगळा भाग बारामती लोकसभा मतदारसंघात येतो. या परिसरात विजय शिवतारे प्रचार करत आहेत.

### मी निवडणूक लढणारच, आता माघार नाही

मी निवडणूक लढवणार, याच्यावर मी ठाम आहे. कुणीही मला काहीही सांगू द्या. मी अजित पवारांना कधीच माफ केला आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदारांना ना सुप्रिया सुळे यांना मत द्यायचंय, ना अजित पवारांना मत द्यायचंय, मग हे मतदार जाणार कुठे असा सवाल शिवतारेंनी उपस्थिती केला आहे. ते पुढे म्हणाले की, अजित पवार गटाकडून बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवार बदलला जाईल अशी चर्चा सुरू आहे. वरिष्ठ नेत्यांनी याचा विचार करावा, अनेक जण इच्छुक आहेत. हर्षवर्धन पाटलांचं मला माहित नाही, पण मी माघार घेणार नाही.

### विजय शिवतारेंची 1 एप्रिलला जाहीर सभा

शिवतारेंची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी अजित पवार गटातील लोकांकडून होत आहे. मी विरोधक आहे, ते मागणी तर करणारंच, असं शिवतारेंनी म्हटलं आहे. विजय शिवतारे 1 तारखेला जाहीर सभा घेणार आहेत. पालखीतळ मैदान सासवड या ठिकाणी शिवतारेंची जाहीर सभा होणार आहे. आता या सभेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.